# 私が歩んだ道

グプテ・ルタ
日本文化研修留学生　インド

賑やかな大都市のムンバイから静かで小さな街の和歌山へ。空を近くに感じることができる高層ビルのある場所から、２階建ての家が立ち並ぶ場所へ、いつも混雑している町から、サイクリングやウォーキングができ、のんびり暮らせる場所へ、コンクリートに囲まれた場所から、自然に囲まれたグリーン（プラネットハウス）まで。風景が全く変わったのに、この９か月で和歌山にすっかり慣れ、くつろげている。

私は和歌山市内の中心地から離れた、和歌山大学から徒歩７分、緑が多い、人が少ない場所に住んでいる。都心の賑やかな雰囲気を味わえないと思いながらも、気づかないうちに、これまで理解できなかった自然の良さを知り、現在の環境に感謝するようになった。騒がしい人々の声や車の音ではなく、鳴いている鳥の声で目が覚める。木々を優しく愛撫している風、季節ごとに変化する四季のファッションなどを経験することは、私には魅力的である。

和歌山に来て最初の数か月、大学の図書館で数え切れないほどの本に囲まれ、営々黙々とやるべきことをリストに挙げ、それを見ながら学習に取り組む喜びは、まるで自分が映画の主人公を演じているかのようであった。そして、大学から貴志に行く近道はワインディングロードで、ヤマザクラ、くすのき、ヤマモモといった木を見るだけで涼しく感じ、その山道はまさに宮崎駿の映画のような雰囲気である。

和歌山での生活は日常でも、退屈することはない。定期的に買い物や図書館や郵便局に行ったりする。時々ハードオフに行ったり、ビーチに行ったり、喫茶店巡りに出かけたり、新しいレストランを探したりする時に、いつも和歌山の様々な景色が見られる。 週に一回ぐらい部屋の窓からお城に向かって挨拶するのも私の生活の一部になっている。夕暮れ時、磯ノ浦で見るサーファーのシルエット、カヌーで紀ノ川を下っている時の一定の動き、和歌山市民図書館から線路の向こうに見える見事な夕焼けの景色を眺めることができる。その様子を見ると、落ち着いた気分になり、リラックスできるようになる。そう言えばやはり高野山のことも思い出される。１年間に 3 回も行ったのに、また行きたくなる。特に思い出に残ったのは町石道で 7 時間もハイキングしたことである。大門に着いた瞬間に、不思議と疲れが取れたのも高野山の魅力の一部だと思っている。



その場所がいくらきれいでも一番大切なのは人間関係である。和歌山で出会った人のことは決して忘れられない。農業ボランティアの NPO の方は桃の節句のお祝いにお食事に誘ってくださり、日本の伝統行事を紹介してくださった。また、空手教室の先生も２か月無料で空手の基本的な動作を教えてくれた。あるロータリーのイベントで出会った、柔道・合気道の先生も研究に関して色々と手伝ってくださった。特に、和歌山での留学生活を支援してくださった WIN コンコードという NPO の皆さんにも感謝している。様々な人、場所を紹介してくださり、貴重な経験ができて、いい思いでしか残っていない。帰国したら、その方に会えなくなることを思えば、これほど寂しいことはない。そのことを考えるだけでも胸が苦しくなる。

「和歌山は住みやすいよ」という WIN コンコードの方と先輩の言葉も、実際に体験するまでは全く理解できなかった。 同じように今年の 9 月に入学してくる留学生もまた私の言うことが理解できないと思うが、とにかく「和歌山は最高の場所だよ !」と言っておきたい。今後、和歌山の思い出を大切にしながら、その思い出を持って、新たに旅行で出会う人々、訪れる場所、旅行での体験を大切にしていきたい。



# माझी वाटचाल

**ऋता गुप्ते**
**जपानी भाषा आणि संस्कृती, संशोधक**
**भारत**

मुंबईच्या गजबजलेल्या महानगरापासून वाकायामा या शांत लहानशा शहरा पर्यंत. गगनचुंबी इमारतींपासून ते आकाशाच्या अगदी जवळ, दुमजली घरांच्या रांगां पर्यंत. खूप गर्दी असलेल्या ट्रेन पासून ते शक्य तितके सायकल चालवणे आणि चालण्यापर्यंत. कॉक्रिटपासून ग्रीन (प्लॅनेट हाऊस) पर्यंत. परिस्थिती पूर्णपणे बदलली असलीतरी, गेल्या आठ महिन्यांपासून मला वाकायामा मध्ये घरासारखं वाटलं आहे.

मी वाकायामाचा शहरी जीवनापासून दूर, वाकायामा विद्यापीठापासून 7 मिनिटांच्या अंतरावर असलेल्या एकाकी टेकडीवर राहते. मी शहराच्या मध्यभागी असलेल्या गजबजलेल्या वातावरणाहून मुकत आहे, असे जरी मला वाटत असले तरी, नकळत यापूर्वी जे लक्षात आले नव्हते त्याबद्दल मला कौतुक वाटायला लागले. सकाळी लोकांच्या आणि गाड्यांच्या आवाजाऐवजी पक्ष्यांच्या किलबिलाटाने उठणे; झाडांना प्रेमाने कुरवाळणारा वारा आणि दर तीन महिन्यांनी बदलणारी ऋतूची फॅशन मला रोज अनुभवायला भुरळ घालते.

सुरुवातीचे काही महिने, विद्यापीठाच्या ग्रंथालयातील असंख्य पुस्तकांनी वेढलेले, माझ्या कामाच्या यादीत मूकपणे काम करण्याचा आनंद म्हणजे एखाद्या चित्रपटातील मुख्य पात्र साकारण्यासारखा होता. विद्यापीठाकडून किशीकडे जाणाऱ्या वळणदार रस्त्यावर, साकुराची जंगली झाडं बघून मला मस्त वाटतं. तो डोंगराळ रस्ता हायाओ मियाझाकी यांचा चित्रपटात बघितलेल्या सीन सारखा आहे.

वाकायामा मधील जीवन रुटीन असले तरी कंटाळवाणे नाही आहे. खरेदीला जा, लायब्ररी किंवा पोस्ट ऑफिसमध्ये जा- कधीकधी हार्डऑफ, कॉफी शॉप, बीचवर, नवीन रेस्टॉरंट्स ला जाऊन वाकायामाचे नजारे पाहते. आठवड्यातून एकदा वाड्याला भेट देणे हा इथल्या जीवनाचा जणू काही एक भाग झाला आहे. सूर्यास्ताच्या आसपास, इसोनोउरामधील सर्फरचे छायचित्र, किनोनदीत कनू करणाऱ्यांची एकसमान हालचाल आणि वाकायामा सिव्हिक लायब्ररीतून दिसणारे रेल्वेमार्ग, सूर्यास्ताचे विहंगम दृश्य देतात. एक्दम रिफ्रेशिंग फीलिंग! रिफ्रेशिंग फीलिंगबद्दल बोलायला गेल तर, मला कोयासानचीही आठवण येते. मी आत्तापर्यंत तीन वेळा जाऊन आले आहे. तरीही मला पुन्हा जायचे आहे. विशेषतः संस्मरणीय म्हणजे चोइशिमिची ७-तासांची पदयात्रा. परंतु दायमोनला पोहोचताच माहित नाही का पण थकवा दूर होतो. मला वाटतं तो कोयासानच्या आकर्षणाचा एक भाग आहे.

ठिकाण कितीही सुंदर असले तरी सर्वात महत्त्वाची गोष्ट असते ती तिथली नाती. वाकायामामध्ये भेटलेल्या लोकांना मी कधीही विसरणार नाही. एका कृषी प्रोजेक्ट चा निमित्त ओळख झालेल्या स्वयंसेवक ने मला कोदोमो नो सेक्कु साजरा करण्यासाठी जेवणासाठी आमंत्रित केले आणि एका पारंपारिक जपानी कार्यक्रमाची ओळख करून दिली. त्या शिवाय कराटे प्रशिक्षक दोन महिने मोफत कराटे मूव्ह देखील शिकवत आहेत. रोटरीच्या एका कार्यक्रमात भेटलेल्या ज्युडो आणि आयकिडो शिक्षकांनी मला माझ्या

संशोधनातही मदत केली. मी WIN Concord ह्या NGO मधील सर्वांचेही आभार मानू इच्छिते, जे वाकायामामधल्या परदेशी विद्यार्थ्यांसाठी अपरिहार्य आहे. जपानमध्ये आल्यापासून, त्यांनी माझी विविध लोकांशी, ठिकाणांची आणि अनुभवांची ओळख करून दिली. माझ्याकडे सुंदर आठवणींशिवाय काहीही नाही. मी घरी परतल्यावर त्यांना भेटण् नक्कीच मिस करणार. नुसता विचार करूनच वाईट वाटतं.

"वाकायामा राहायला छान आहे" हे WIN Concord चे सर्वजणांचे शब्द मला प्रत्यक्षात अनुभवेपर्यंत समजले नव्हते. त्याच प्रकारे, मला वाटत नाही की जे आंतरराष्ट्रीय विद्यार्थी या सप्टेंबरमध्ये येतील त्यांनापण माझे म्हणणे समजेल, तरीही मी त्यांना सांगेन, "वाकायामा हे सर्वोत्तम ठिकाण आहे!"

वाकायामाच्या आठवणी मी माझ्या भावी प्रवासात नक्कीच घेऊन जाईन. मी ज्यांना भेटेन, जिकडे जाइन, माझ्या अनुभवांमध्ये वाकायामाचा थोडासा समावेश असेल.